दावा दाखल तारीख २०/१२/२०१७
दावा नोंद दिनांक २०/१२/२०१७
निकाल दिनांक २३/०४/२०२६
कालावधी वर्ष ०८, महिना ०४, दिवस ०३

<u>न्यायाधीश, सहकार न्यायालय, जळगांव यांचे न्यायालयात</u>
(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)

दावा क्र.जे./९३/२०१७
निशाणी क्र.९३

१) जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., **... वादी**
रिंगरोड, जळगांव
ता.जि.जळगांव.

विरूद्ध

१) जगदिश भास्कर सोनार
केशव मंदीरा जवळ, एरंडोल जि. जळगांव.

२) अमोल कौतीक पाटील
द्वारा— जे.डी.सी.सी.बँक लि.मंगरूळ शाखा
ता.पारोळा जि.जळगांव.

३) रविंद्र काशिनाथ पाटील
द्वारा— जे.डी.सी.सी.बँक लि.भातखेडे शाखा
भातखेडे ता.एरंडोल जि. जळगांव.

४) केशवराव भिका पाटील
भाटे गल्ली रुम नं.२४२४
एरंडोल जि. जळगांव.

५) बाळासाहेब दौलत देशमुख
द्वारा— जे.डी.सी.सी.बँक लि. विभागीय उप व्यवस्थापक
कार्यालय एरंडोल जि. जळगांव.

23/4/26

Scanned with OKEN Scanner

६) प्रकाश गजमल खैरनार
द्वारा– जे.डी.सी.सी.बँक लि. कासोदा, शाखा कासोदा
ता.एरंडोल जि. जळगांव. **.. जाब देणार**

वादीतर्फे वकील : विक्रम पवार
जाब देणार क्र.१, ४ व ५ : विनाकैफियत
जाब देणार क्र.२ व ३ तर्फे वकील: सी.आर.पाटील
जाब देणार क्र.६: वाद फेटाळला आहे

न्यायनिर्णय
(दिनांक २३/०४/२०२६)

१) प्रस्तुत वाद रक्कम वसुलीसाठी आहे.

२) वादीचे असे कथन आहे की, ती नोंदणीकृत सहकारी संस्था असून बँकिंगचा व्यवसाय करते. जाब देणार क्र.१ ते ६ हे तिचे आजी/माजी कर्मचारी आहेत. जाब देणार क्र.१ ने वादीकडे घरकर्ज मागणीसाठी केलेल्या अर्जावरून वादीने त्यास दि.१०/१२/२०१२ रोजी रक्कम रु.७,७६,०००/– इतके कर्ज मंजूर केले. दि.१५/१२/२०१२ रोजी रु.३,८८,०००, दि.२५/०२/२०१३ रोजी रु.१,९४,००० आणि दि.१०/०६/२०१३ रोजी रु.१,९४,०००/– अशी उचल जाब देणाराने केली. त्यानंतर जाब देणार क्र.१ ने केलेल्या वाढीव घ रकर्ज अर्जानुसार वादीने दि.०७/०३/२०१४ रोजी रक्कम रु.३,१०,०००/– घरकर्ज मंजूर केले. जाब देणार क्र.१ने दि. ११/०३/२०१४ रोजी रक्कम रु.७५,०००/– आणि दि.२६/०३/२०१४ रोजी रु.२,३५,०००/– ची उचल केली आहे. जाब देणार क्र.२ व ३ हे सदर कर्जासाठी जामीन आहेत.

SP
23/4/26

Scanned with OKEN Scanner

३) जाब देणार क्र.१ ने दि.१०/०८/२०१२ रोजी केलेल्या संगणक कर्ज मागणी अर्जावरुन वादीने दि.१७/०८/२०१२ रोजी रु.३८,३५०/— इतके संगणक कर्ज मंजूर केले. दि.०७/०३/२०१२ रोजी जाब देणार क्र.१ ने सदर कर्जाची उचल केली. त्याला जाब देणार क्र.४ व ५ हे जामिनदार आहेत.

४) जाब देणाराच्या अर्जानुसार वादीने त्याला दि.२०/०२/२०१४ रोजी कॅश क्रेडीट कर्ज रु.४,५०,०००/— मंजूर व वाटप केले. त्यासाठी जाब देणाराने वचनचिठ्ठी आणि रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर जामिनदाराच्या सहीसह करारनामा व हमीपत्र करुन दिले आहे. कर्जाचे खाते क्र.५५७३३५ असा आहे. दि. २८/०२/२०१४ रोजी जाब देणाराने सदर कर्जाची उचल केली आणि सदर कर्ज खात्यामध्ये व्यवहार सुरू केला. त्यानंतर कर्मचारी कॅश क्रेडीट मर्यादेमध्ये वाढ झाल्याने जुलै २०१४ मध्ये जाब देणाराने वाढीव कर्ज मागणीसाठी अर्ज केला. त्यानुसार वादीने त्याला कर्ज मर्यादा रु.५,०४,०००/— मंजूर केले. जाब देणाराने वचनचिठ्ठी आणि रु.१००/— च्या स्टॅम्प पेपरवर जामिनदाराच्या सहीने करार करून दिला आहे. दि. १२/०७/२०१४ रोजी जाब देणार क्र.१ ने रु.५,०४,०००/— कॅश क्रेडीट कर्ज घेतले आणि त्याची उचल वेळोवेळी विथड्रॉवल स्लीप ने केली आहे. कॅश क्रेडीट कर्जात जाब देणार क्र.६ जामीन आहे.

५) सदर तिन्ही कर्जाच्या परत फेडीसाठी जाब देणार क्र.१ ने वादी बँकेचे कर्ज धोरणानुसार सर्व अटी व शर्ती मान्य केल्या असून कर्जरोखा, प्रतिज्ञापत्र, वचनचिठ्ठी, तारणपत्र व इतर दस्तऐवज जाब देणार क्र.१ ते ६ यांनी तयार

23/4/26

Scanned with OKEN Scanner

करून दिले आहेत. कर्जाचा हप्ता ठरलेल्या व्याजानुसार भरणेचे आश्वासन जाब देणार क्र.२ ते ६ ने दिले आहे.

६) करारानुसार जाब देणार क्र.१ ने कर्जाची परतफेड त्याच्या पगारातून मासिक हप्त्यामध्ये करणेची होती. व्याजाचा दर वचनचिठ्ठीत नमुद केल्याप्रमाणे ठरला होता. जाब देणार क्र.१च्या गैरवर्तनामुळे वादी बँकेने त्याला दि. १३/१०/२०२५ पासून बँकेच्या सेवेतून कायमचे काढून टाकले. त्यामुळे त्याच्याकडून मासिक हप्त्याद्वारे होणारी कर्जाची परतफेड थांबली आहे. थकीत कर्जाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	कर्जाचा प्रकार	थकीत रक्कम (मुद्दल)	दिनांक ३१.०८.२०१७ अखेर येणे व्याज	एकूण थकबाकी	व्याजदर
१.	घरकर्ज	९५४३७६	४६७१३७	१४२१५१३	१०.५०%
२.	संगणक कर्ज	२५१६९	८९२१	३४०९०	९.५०%
३.	कॅश क्रेडीट	५०५१९९	१९१६९४	६९६८९३	१०.५०%
	एकूण—	१४८४७४४	६६७७५२	२१५२४९६	

७) वादीने जाब देणाराकडे वारंवार कर्जाच्या थकीत रकमेची मागणी करून देखील जाब देणाराने रकमेचा भरणा न केल्यामुळे वादीला प्रस्तुत वाद दाखल करणे भाग पडले आहे. त्याने जाब देणार क्र.१ व ३ यांच्याकडून रु.१४,२१,५१३/— आणि प्रतिवर्षी १२.५०% दराने पुढील व्याजाची मागणी केली आहे. तसेच जाब देणार क्र.१,४ व ५ यांच्याकडून रक्कम रु.३४,०९०/— आणि प्रतिवर्षी ११.५०% दराने पुढील व्याजाची मागणी केली

23/4/26

Scanned with OKEN Scanner

आहे. त्याचप्रमाणे जाब देणार क्र.१ व ६ यांच्याकडून रु.६,९६,८९३/— ची मागणी केली आहे.

८) जाब देणार क्र.१ व ५ हे हजर होऊन देखील त्यांनी कैफियत दाखल केली नाही. तसेच जाब देणार क्र.४ ने देखील हजर होऊनही कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे त्यांचे विरुद्ध प्रस्तुत वादाचे कामकाज विनाकैफियत चालणेचा आदेश न्यायालयाने अनुक्रमे दि.१६/०४/२०१९ आणि दि. ०६/११/२०१९ रोजी केला आहे. जाब देणार क्र.६ वर समन्स बजावणी होणेसाठी वादीने पुर्तता न केलेमुळे प्रस्तुत वादाचे कामकाज त्याचेविरुध्द फेटाळणेचा आदेश न्यायालयाने दि.११/०७/२०२२ रोजी केला आहे.

९) जाब देणार क्र.२ व ३ ने नि.२० येथे कैफियत दाखल केली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, जाब देणार क्र.१ कर्जफेड करू शकेल इतकी मालमत्ता त्याच्याकडे आहे. कर्जाची रक्कम देण्यास जाब देणार क्र.१ जबाबदार आहे, जाब देणार क्र.१ व ३ त्यासाठी जबाबदार नाहीत. जाब देणार क्र.१ला गृहकर्ज कधी व किती दिले या बाबतीत त्यांना काहीही माहिती नाही. त्याला कर्ज देतेवेळी वादीने जी काही कागदपत्रे करून घेतली त्याबाबतीत देखील त्यांना माहिती नाही.

१०) जाब देणार क्र.१ने वादीकडून संगणक कर्ज मागणी केव्हा केली आणि किती रक्कम घेतली हे त्यांना ज्ञात नाही, कारण संगणक कर्जाचे ते जामिनदार नाहीत आणि त्यांची जबाबदारीही नाही. जाब देणार क्र.१ यास दि. १२/०७/२०१४ रोजी दिलेल्या कर्जास ते जामिनदार नाहीत.

SP
23/4/26

Scanned with OKEN Scanner

११) कर्जाच्या अटी जाब देणार क्र.१ ने मान्य केल्या आहेत. कर्जरोखे, प्रतिज्ञापत्र, वचनचिठ्ठी, तारणपत्र व इतर कागदपत्रे यांच्यावर जाब देणार क्र.२ व ३ यांच्यासमोर मजकूर भरून घेतला नव्हता आणि त्यांना याबाबतीत काहीही माहिती दिली नव्हती. त्यांनी कर्जाची हमी दिलेली नाही.

१२) त्यांनी असेही सांगितले आहे की, मासिक हप्त्याद्वारे रक्कम वसूल करण्याची जबाबदारी वादीची आहे, त्यामुळे जाब देणार क्र.२ व ३ हे कोणतीही रक्कम परतफेड करण्यास जबाबदार नाहीत. वादीने जाब देणार क्र. १ला दिलेले कर्ज वेगवेगळ्या स्वरुपाची आणि वेगवेगळ्या कारणांसाठी असल्याने प्रस्तुत वादास मुदतीची बाधा आहे. वादीने वेगवेगळ्या स्वरुपाची कर्जे वेगवेगळ्या कारणांसाठी दिल्यामुळे आणि जाब देणार क्र.२ व ३ हे काही कर्जाच्या बाबतीत जामिन नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द वाद चालू शकत नाही.

१३) जाब देणार क्र.१ची एरंडोल येथील सि.स.क्र.८०९ ही मिळकत असून वादीने जाब देणार क्र.१ कडून रक्कम वसूल करणे ही वादीची जबाबदारी आहे.

१४) जाब देणार क्र.२ व ३ विरुध्द केलेली मागणी चुकीची व बेकायदेशीर असलेची कथने करून, जाब देणार क्र.२ व ३ विरुध्द वाद रद्द करणेची मागणी त्यांनी केली आहे.

१५) प्रस्तुत कामी नि.२७ येथे काढण्यात आलेले मुद्दे व त्यांचेवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे :—

23/4/25

Scanned with OKEN Scanner

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	गृह कर्जाची रक्कम रु.१४,२१,५१३/— ची प्रतिवर्षी १२.५०% व्याज दराने जाब देणार क्र. १ व ३ यांचे कडून संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वसूली करणेस वादी बँक पात्र आहे काय?	अशंतः होकारार्थी
२.	संगणक कर्जाची रक्कम रु.३४,०९०/— ची प्रतिवर्षी ११.५०% व्याज दराने जाब देणार क्र. १, ४ व ५ यांचे कडून संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वसूली करणेस वादी बॅंक पात्र आहे काय?	नकारार्थी
३.	कॅश क्रेडीट कर्जाची रक्कम रु.६,९६,८९३/-- ची प्रतिवर्षी १०.५०% व्याज दराने जाब देणार क्र.१ व ६ यांचे कडून संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वसूली करणेस वादी बॅंक पात्र आहे काय?	अंशतः होकारार्थी
४.	जाब देणार क्र.१ ने घेतलेल्या कर्जास जाब देणार क्र.२ व ३ जामिन राहिले असलेचे वादीने सिध्द केले काय?	अंशतः होकारार्थी
५.	अंतिम आदेश व निवाडा काय?	वाद अंशतः मंजूर

23/4/26

Scanned with OKEN Scanner

कारणमिमांसा

१६) जाब देणार क्र.१ ला घरकर्ज, संगणक कर्ज आणि कॅश क्रेडीट अशी ३ कर्जे दिल्याचे कथन करुन वादीने त्यांची वसुली जाब देणारांकडून मागितली आहे. वादीने त्याचा अधिकृत इसम मंगल नागो सोनवणे याचा सरतपास नि.३१ येथे दाखल केला असून जादा सरतपास नि.४५ येथे दाखल केला आहे. तसेच त्याने गृहकर्ज मागणी अर्ज नि.४९, करारनामा नि.५०, वचनचिठ्ठी नि.५५,५६ व ५७, वाढीव कर्ज मागणी अर्ज नि.५८, वाढीव कर्ज मंजूरी पत्र नि.५९, करारनामा नि.६०, वचनचिठ्ठी नि.६२, खाते उतारा नि.७८ ते ८२, जाब देणार क्र.२ व ३ यांनी जाब देणार क्र.१ ला वकिलांमार्फत पाठविलेली नोटीस नि. ८८, कॅश क्रेडीट कर्जाचे नुतनीकरणाचे पत्र नि.६३, वचनचिठ्ठीचे पत्र नि.६५, करारानामा नि.६६, कॅश क्रेडीट कर्ज रक्कम घेतलेबाबत विथड्रॉवल स्लीप्स नि. ६७ ते ७१ कॅश क्रेडीट भरणा पावती नि.६६ आणि खाते उतारा नि.७२ व ७४ अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

१७) मुद्दा क्र.१ व ४ करिता :— जाब देणार क्र.१ने वादी कडून घरकर्ज घेतलेचे आणि त्यासाठी जाब देणार क्र.२ व ३ जामिन असलेचे वादीचे कथन आहे. जाब देणार क्र.१ ने हजर होउन देखील कैफियत दाखल केली नसलेमुळे सदर कर्ज त्याला मान्य असलेप्रमाणे आहे.

१८) जाब देणार क्र.२ व ३ यांच्या कैफियतीमधील तसेच सरतपासामधील कथनांनुसार जाब देणार क्र.१ यास वादीने गृहकर्ज कधी आणि किती दिले याबाबत त्यांना माहित नाही. सरतपासामध्ये त्यांनी असेही सांगितले की, जाब देणार क्र.१ यास कर्ज देतेवेळी जी कागदपत्रे करून घेतली त्याबाबत त्यांना कोणतीही माहिती दिली नव्हती. परंतु, उलटतपासामध्ये जाब देणार क्र.२

Sd/- 23/4/26

Scanned with OKEN Scanner

व ३ या दोघांनी नि.५० या गृहकर्जाच्या करारनाम्यावरील त्यांच्या सह्या मान्य केल्या. परंतु, त्यावेळी स्टॅम्प पेपर कोरा होता असे त्यांनी सांगितले. नि.५० करारपत्राचे अवलोकन करता तो करारनामा दि.१२/१२/२०१२ रोजीच्या स्टॅम्प पेपरवर छापलेला रु.७,७६,०००/– च्या गृहकर्जाचा करारनामा आहे. त्यावर जामिनदारांचे नाव अशा मथळ्याखाली जाब देणार क्र.२ व ३ यांनी सह्या केलेचे दिसते. जाब देणार क्र.२ व ३ हे वादी बँकेचे कर्मचारी आहेत. कर्जकागदपत्रे म्हणजे काय असतात, कर्जाच्या करारनाम्यावर जामिनदार म्हणून सही करण्याचा अर्थ काय असतो हे त्यांच्या नोकरीमुळे त्यांना माहित असणे अपेक्षित आहे. तसेच, त्यांनी जाब देणार क्र.१ ला वकिलांमार्फत पाठविलेल्या नि.८८ नोटीसमध्ये देखील त्यांनी असे म्हटले आहे की, जाब देणार क्र.१ ने वादीकडून गृहकर्ज घेतले असून सदर कर्जास त्यांची जामिनदार होण्याची इच्छा नसताना देखील त्यांना कर्जास जामिनदार केले आहे. या सर्वावरून हे स्पष्ट होते की, जाब देणार क्र.१ ने घेतलेल्या रु.७,७६,०००/– च्या घरकर्जास जाब देणार क्र.२ व ३ हे जामिन होते. अशा परिस्थितीत घरकर्जाची कागदपत्रे पुराव्याचे कामी वाचता येतात. ती असे स्पष्ट करतात की, सदर कर्जास प्रतिवर्षी १०.५०% इतका व्याजदर ठरला होता.

१९) वादीच्या कथनानुसार, त्यानंतर दि.०७/०३/२०१४ रोजी तिने जाब देणार क्र.१ यास रु.३,१०,०००/– इतके वाढीव कर्ज मंजूर केले आणि त्यासाठी देखील जाब देणार क्र.२ व ३ जामिनदार असलेचे तिचे म्हणणे आहे. जाब देणार क्र.२ व ३ यांनी गृहकर्जाचा संपूर्ण व्यवहार नाकारला आहे. अशा परिस्थितीत वाढीव गृहकर्जाच्या नि.६० करारनाम्यावरील सह्या मात्र वादीने जाब देणार क्र.२ व ३ यांना त्यांच्या उलटतपासामध्ये दाखविल्या नाहीत. सदर वाढीव कर्जास ते जामिनदार असलेबाबत प्रश्न देखील वादीने त्यांना

SP
23/4/26

Scanned with OKEN Scanner

उलटतपासामध्ये विचारला नाही. परिणामी, जाब देणार क्र.१ ने घेतलेल्या रु.३,१०,०००/— च्या वाढीव घरकर्जास जाब देणार क्र.२ व ३ हे जामिन असलेचे स्पष्ट होत नाही.

२०) खाते उतारा असे दर्शवितो की, जाब देणार क्र.१ ला वाढीव घरकर्ज रु.७५,०००/— दि.११/०३/२०१४ रोजी अदा करतेवेळी वादीला पहिल्या घरकर्जापोटी मुद्दल रक्कम रु.६,९६,३०६/— आणि व्याज रु.१,२०,७०१/— अशी एकूण रक्कम रु.८,१७,००७/— येणे बाकी होती. सदर रकमेच्या परतफेडीसाठी जाब देणार क्र.१ हा कर्जदार म्हणून आणि जाब देणार क्र.२ व ३ हे जामिनदार म्हणून वैयक्तिक व संयुक्तिकरित्या जबाबदार ठरतात. सदर रकमेवर पुढील व्याज करारानुसार प्रतिवर्षी १०.५०% दराने मिळणेचा वादीस अधिकार आहे.

२१) खाते उताऱ्यानुसार दि.३१/०८/२०१७ रोजी वादीला मुद्दल रु.९,५४,३७६/— आणि व्याज रु.४,६७,१३७/— अशी एकूण रक्कम रु.१४,२१,५१३/— येणे होती. त्यातून उपरोक्त रक्कम रु.८,१७,००७/— वजा जाता उर्वरित रक्कम रु.६,०४,५०६/— च्या परतफेडीसाठी जाब देणार क्र.१ हा कर्जदार म्हणून जबाबदार ठरतो. सदर रकमेवर पुढील व्याज करारानुसार प्रतिवर्षी १०.५०% दराने मिळणेचा वादीस अधिकार आहे.

अशाप्रकारे मुद्दा क्र.१ व ४ चा निष्कर्श अंशत: होकारार्थी येतो.

२२) मुद्दा क्र.२ करिता :— वादीची दुसरी मागणी संगणक कर्ज वसुलीची आहे. मात्र वादीच्या साक्षीदाराने त्याच्या वाढीव सरतपासामध्ये असे सांगितले

23/4/26

Scanned with OKEN Scanner

आहे की, जाब देणार क्र.१ ने संगणक कर्जाची पूर्ण परतफेड केली आहे. सबब, आता वादीची संगणक कर्ज वसुलीची मागणी निष्फळ झाली आहे.

परिणामी, मुददा क्र.२ चा निष्कर्ष निष्फळ असा येतो.

२३) मुद्दा क्र.३ करिता :— जाब देणार क्र.१ ने वादीकडून घेतलेल्या कॅश क्रेडीटच्या येणे बाकी रकमेची वसुली देखील वादीने मागितली आहे. जाब देणार क्र.१ ने हजर होउन देखील कैफियत दाखल केली नसलेमुळे वादातील कर्ज त्याला मान्य असलेप्रमाणे आहे. तसेच, जाब देणार क्र.१ ने वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास देखील घेतला नाही. परिणामी, वादीचा तोंडी तसेच कागदोपत्री पुरावा खोडून काढला गेला नाही. सबब, तो पुराव्याचे कामी वाचता येतो. त्यावरून असे स्पष्ट होते की, दि.१२/०७/२०१४ रोजी जाब देणार क्र.१ ने वादीकडून कॅश क्रेडीट मर्यादा रक्कम रु.५,०४,०००/— मंजूर करून घेतली आणि तिची वेळोवेळी उचल केली. तसेच, सदर कर्जास जाब देणार क्र.६ ने जामिनकी स्विकारली. खाते उतारा असे दर्शवितो की, सदर कर्जापोटी वादीस दि.३१/०८/२०१७ रोजी रु.५,०५,१९९/— आणि व्याज रु.१,९१,६९४/— अशी एकूण रक्कम रु.६,९६,८९३/— इतकी येणे बाकी होती.

२४) खाते उतारा दंडव्याजाची आकारणी दर्शवितो. कायद्याच्या निश्चित स्थितीनुसार दंडव्याज मंजूर करता येत नसलेणे सदर रकमा वजा करणेत येत आहेत.

SP
23/4/26

Scanned with OKEN Scanner

२५) यावरून मी अशा निष्कर्षास आले आहे की, दि.३१/०८/२०१७ अखेर वादीस कॅश क्रेडीट कर्जापोटी रक्कम रु.६,९५,८८३/— इतकी येणे बाकी आहे.

२६) रक्कम वसुली जाब देणार क्र.१ व ६ यांचे कडून संयुक्तिक तसेच वैयक्तिकरित्या होण्याची परवानगी वादीने मागितली आहे. परंतु, वादीने जाब देणार क्र.६ ला समन्स बजावणीची पुर्तता न केलेमुळे न्यायालयाने जाब देणार क्र.६ विरुध्द वाद पूर्वीच फेटाळला आहे. सबब, सदर रकमेच्या परतफेडीसाठी जाब देणार क्र.१ हा कर्जदार म्हणून जबाबदार ठरतो.

अशा प्रकारे मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी येतो.

उपरोक्त विवेचनावरून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१) प्रस्तुत वाद खर्चासह अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२) जाब देणार क्र.१ ते ३ यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वादीस घरकर्जापोटी रु.८,१७,००७/— द्यावेत व सदर संपूर्ण रक्कमेची परतफेड होईपर्यंत रु.६,९६,३०६/— वर दि.११/०३/२०१४ पासून प्रतिवर्षी १०.५०% दराने होणारे सरळ व्याज द्यावे.

३) जाब देणार क्र.१ ते ३ यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वादीस वाढीव घरकर्जापोटी रु.६,०४,५०६/— द्यावेत व सदर संपूर्ण रक्कमेची परतफेड होईपर्यंत रु.३,१०,०००/— वर

SP
23/4/26

Scanned with OKEN Scanner

दि.०१/०९/२०१७ पासून प्रतिवर्षी १०.५०% दराने होणारे सरळ व्याज द्यावे.

४) जाब देणार क्र.१ यास आदेश देणेत येतो की, त्याने वादीस कॅश क्रेडीट कर्जापोटी रक्कम रु.६,९५,८८३/— द्यावेत.

५) येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

23/4/26

ठिकाण : जळगाव

दिनांक : २३/०४/२०२६

एस.एस.पोरे
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, जळगांव

Scanned with OKEN Scanner

दावा दाखल तारीख २०/१२/२०१७
दावा नोंद दिनांक २०/१२/२०१७
निकाल दिनांक २३/०४/२०२६
कालावधी वर्ष ०८, महिना ०४, दिवस ०३

न्यायाधीश, सहकार न्यायालय, जळगांव यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)

दावा क्र.जे./९३/२०१७
निशाणी क्र.९४

१) जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., **... वादी**
रिंगरोड, जळगांव
ता.जि.जळगांव.

विरूद्ध

१) जगदिश भास्कर सोनार
केशव मंदीरा जवळ, एरंडोल जि. जळगांव.

२) अमोल कौतीक पाटील
द्वारा— जे.डी.सी.सी.बँक लि.मंगरूळ शाखा
ता.पारोळा जि.जळगांव.

३) रविंद्र काशिनाथ पाटील
द्वारा— जे.डी.सी.सी.बँक लि.भातखेडे शाखा
भातखेडे ता.एरंडोल जि. जळगांव.

४) केशवराव भिका पाटील
भाटे गल्ली रुम नं.२४२४
एरंडोल जि. जळगांव.

५) बाळासाहेब दौलत देशमुख
द्वारा— जे.डी.सी.सी.बँक लि. विभागीय उप व्यवस्थापक
कार्यालय एरंडोल जि. जळगांव.

23/4/26

Scanned with OKEN Scanner

६) प्रकाश गजमल खैरनार
द्वारा— जे.डी.सी.सी.बँक लि. कासोदा, शाखा कासोदा
ता.एरंडोल जि. जळगांव. .. **जाब देणार**

वादीतर्फे वकील : विक्रम पवार
जाब देणार क्र.१, ४ व ५ : विनाकैफियत
जाब देणार क्र.२ व ३ तर्फे वकील: सी.आर.पाटील
जाब देणार क्र.६: वाद फेटाळला आहे

हुकुमनामा
(दिनांक २३/०४/२०२६)

दि.२०/१२/२०१७ रोजी दाखल केलेल्या वरील वादाचा दि.२३/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९६ अन्वये दिलेल्या निकालाप्रमाणे प्रस्तुत वाद खालीलप्रमाणे निकाली करणेत येत आहे.

१) प्रस्तुत वाद खर्चासह अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२) जाब देणार क्र.१ ते ३ यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वादीस घरकर्जापोटी रु.८,१७,००७/— द्यावेत व सदर संपूर्ण रक्कमेची परतफेड होईपर्यंत रु.६,९६,३०६/— वर दि.११/०३/२०१४ पासून प्रतिवर्षी १०.५०% दराने होणारे सरळ व्याज द्यावे.

३) जाब देणार क्र.१ ते ३ यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वादीस वाढीव घरकर्जापोटी रु.६,०४,५०६/— द्यावेत व सदर संपूर्ण रक्कमेची परतफेड होईपर्यंत रु.३,१०,०००/— वर

23/4/26

Scanned with OKEN Scanner

दि.०१/०९/२०१७ पासून प्रतिवर्षी १०.५०% दराने होणारे सरळ व्याज द्यावे.

४) जाब देणार क्र.१ यास आदेश देणेत येतो की, त्याने वादीस कॅश क्रेडीट कर्जापोटी रक्कम रु.६,९५,८८३/— द्यावेत.

शिवाय जाब देणारांनी तपशिलाप्रमाणे दावा खर्चाची रक्कम रु.२९,०९१/— वादीला द्यावी व स्वत:चा खर्च स्वत: सोसावा.

अ.क्र.	खर्चाचा तपशील	वादी	जाब देणार
१	कोर्ट फी स्टॅम्प	१४,७६०/—	
२	वकिल फी	१४,१२१/—	१४,१२१/—
३	सेवा शुल्क	२१०/	
	एकूण रु.	२९,०९१/—	१४,१२१/—

(एकूण अक्षरी रुपये एकोणतीस हजार एक्याण्णव मात्र)

आज दि.२३/०४/२०२६ रोजी हा निवाडा माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

23/4/26

ठिकाण : जळगाव

दिनांक : २३/०४/२०२६

एस.एस.पोरे
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, जळगाव

Scanned with OKEN Scanner